# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ अ‍ॅण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी

दुसरा मजला, वैद्यकीय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवेलगत, पिंपरी-४११०१८

**जाहिरात क्र. ११८/२०१९, क्रमांक : वैद्य/९/कावि/४७४०/२०१९, दिनांक १३/११/२०१९**

## Walk - in - Interview (थेट मुलाखत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ अ‍ॅण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत आशा स्वयंसेविका (ASHA) नियुक्ती कामी खालील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | रुग्णालय/ दवाखाना | कामकाज कार्यक्षेत्र | रिक्त पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आशा स्वयंसेविका (ASHA) | आकुर्डी रुग्णालय | जाधववाडी | ०१ | किमान ८ (आठवी) उत्तीर्ण, विवाहित महिला, उच्च शिक्षित महिलांना प्राधान्य. शासकीय सेवेत लिंक वर्कर व आरोग्यविषयक कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य, तसेच स्थानिक, आदिवासी, विधवा, परितक्त्या महिलांना व स्वयंसेवी संस्थेची कार्यकर्ती यांना प्राधान्य. | किमान २५ ते कमाल ४५ वर्षे | दिनांक २६/११/२०१९ सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत |
| | | भोसरी रुग्णालय | धावडेवस्ती | ०१ | | | |
| | | | सदगुरुनगर | ०१ | | | |
| | | | चक्रपाणी वसाहत | ०१ | | | |
| | | | मोशी दवाखाना परिसर | ०१ | | | |
| | | | डुडुळगांव | ०१ | | | |
| | | | दिघी (आदर्शनगर व भारतमाता नगर) | ०१ | | | |
| | | वाय.सी.एम. रुग्णालय | लांडेवाडी/ फुलेनगर | ०१ | | | |
| | | | नेहरूनगर- गवळीमाथा | ०१ | | | |
| | | सांगवी रुग्णालय | फुगेवाडी दवाखाना परिसर | ०१ | | | |
| | | जिजामाता रुग्णालय | पिंपळे सौदागर- पवनानगर | ०१ | | | |
| | | | काळेवाडी | ०१ | | | |
| | | | एकूण | १२ | | | |

**अटी व शर्ती :**

०१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणाऱ्या वरील पदाची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.

०२) सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा. आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

०३) सदरची पदे केवळ प्रकल्प कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असून, ३१ मार्च २०२० पर्यंत अथवा प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

०४) सदरची पदे पूर्णपणे केवळ प्रकल्प कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असल्याने अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही. ज्या दिवशी सोसायटीस सदर पदाची आवश्यकता नसेल त्या वेळी कोणत्याही नोटीसीशिवाय त्यांची सेवा समाप्त केली जाईल. याकामी नियुक्तीवेळी रु. १००/- चे स्टॅम्पपेपरवर बंधपत्र (करारनामा) करून द्यावा लागेल.

०५) सदर जाहिरातीमधील पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.

०६) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत.

०७) मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास एक तासामध्ये, म्हणजे सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांच्याकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करण्यात येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय सदस्य सचिव तथा वैद्यकीय संचालक पिं.चिं.म.न.पा. यांचा राहील.

०८) आशा स्वयंसेविका जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या कामकाज क्षेत्राची स्थानिक/ कायमची रहिवासी असावी. जर जाहिरातीमध्ये नमूद कार्यक्षेत्राची आशा स्वयंसेविका उपलब्ध न झाल्यास लगतच्या कार्यक्षेत्रातील आशा स्वयंसेविका यांचे पात्र अर्जांचा विचार केला जाईल.

०९) आशा स्वयंसेविकेस मासिक ठोक वेतन, मानधन अथवा कोणताही एकत्रित दरमहा भत्ता अदा केला जाणार नाही.

१०) नियुक्त आशा स्वयंसेविकेस शासन आदेशानुसार कामावर आधारित मोबदला डी.बी.टी.द्वारे थेट बँक खात्यावर अदा केला जाईल व शासनाकडून वेळोवेळी प्राप्त सूचना लागू राहतील.

११) सदर पदभरतीची निवड व प्रतिज्ञा यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

१२) सदर पदांची मुलाखत १५ गुणांची असेल.

**१३) सदर पदाचे मुलाखतीमध्ये खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील**

**(अ)** किमान आठवी पास महिला असणे आवश्यक. आठवी ते दहावी पास असल्यास शुन्य गुण व त्यापुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या पात्रतेसाठी ०२ गुण याप्रमाणे गुण देण्यात येतील. (उदा. बारावी पास असल्यास ०४ गुण, निवड समितीस जास्तीतजास्त ०६ गुण देण्यात येतील), **(ब)** आरोग्यविषयक कामकाजाच्या अनुभव प्रत्येक वर्षाच्या अनुभवासाठी ०१ गुण देण्यात येईल. चांगल्या स्वयंसेवी संस्थेची कार्यकर्ती असल्यास अधिक गुण देण्यात येतील (जास्तीतजास्त ०५ गुण देण्यात येतील), **(क)** विधवा/ परित्यक्त्या महिला असल्यास ०२ गुण देण्यात येतील., **(ड)** उत्तम संभाषण व प्रोत्साहन कौशल्यास जास्तीतजास्त ०२ गुण देण्यात येतील.

१४) मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित राहावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

**कागदपत्रे-** १) इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीला येताना म.न.पा. वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे व खालील कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात (अर्जासोबत मूळ कागदपत्रे जोडू नयेत). २) पासपोर्ट साईज फोटो, ३) जन्मदाखल्याचा पुरावा (जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला)(, ४) रहिवासी दाखला, ५) ओळख प्रमाणपत्र, ६) अनुभव प्रमाणपत्र.

१५) **मुलाखतीचे ठिकाण:** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय, पहिला मजला, चाणक्य हॉल, पिंपरी, पुणे-४११०१८.

स्वाक्षरी/-

**अतिरिक्त आयुक्त (१),**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८**

www.nmk.co.in